# सांगा निरोप माझा

सांगा निरोप माझा मी बोलले फुलांना
येईल तो पहाटे माझा सखा जीवाचा

जलबिंदू पावसाचे, झाडावरून पडती
नि:श्वास पाखरांचे, घरट्यामधून घुमती
वाटेवरी प्रियाच्या बहरून धुंद नाचा
सांगा निरोप माझा, मी बोलले फुलांना

प्राण तोलले मी, डोळ्यात आज माझ्या
विरह यातना या, माझ्या वैरीच झाल्या
व्यथा मम मनाची, जाउन त्यास सांगा
सांगा निरोप माझा, मी बोलले फुलांना

– पद्‌माकर चित्रे
('बोल अंतरीचे' या कवितासंग्रहातून)